जो कोणी सदाचाराने वागत असेल, मग तो पुरूष असो वा स्त्री, आणि श्रद्धावंत असेल त्यास आम्ही निर्मळ जीवन प्रदान करू; आणि अशांना आम्ही त्यांच्या उत्तम कर्मांनुसार त्यांचा मोबदला निश्चितच प्रदान करू. (१६:९८)

# इस्लाम मध्ये स्त्रीचे स्थान



मुहम्मद जफरूल्लाह खान

# इस्लाम मध्ये स्त्रीचे स्थान

मुहम्मद ज़फरूल्लाह खान

पुस्तकाचे नावः इस्लाम मध्ये स्त्रीचे स्थान
लेखकः मुहम्मद ज़फरूल्लाह खान
अनुवादकः डॉ. बशारत अहमद
टाईपिंग व सेटींगः खान मामून अहमद एतेज़ाज़
प्रकाशन वर्षः २०२२
संख्याः ५००
प्रकाशकः मुद्रण व प्रकाशन विभाग,
कादियान-१४३५१६ जि. गुरदासपूर, (पंजाब)
मुद्रण : फजले उमर प्रिंटींग प्रेस, कादियान, भारत.

Name of the book: Woman In Islam
Writer: Muhammad Zafrullah Khan
Translator: Dr. Basharat Ahmad
Typing & Setting: Khan Mamoon Ahmed Etyzaz
Edition: 2022
Quantity: 500
Publisher: Nazarat Nashr-o-Isha'at,
Qadian, 143516
Printed at: Fazl-e-Umar Printing Press,
Qadian, Dist. Gurdaspur, (Punjab)INDIA

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | i |
| **इस्लाम मध्ये स्त्रीचे स्थान** | १ |
| आध्यात्मिक समानता | ३ |
| श्रम विभागणी | ७ |
| विवाह | ९ |
| पति आणि पत्नींची कर्तव्ये आणि दायित्वे | १२ |
| घटस्फोट | १५ |
| बहुपत्नीत्व | २२ |
| माता | २५ |
| स्त्रीची आर्थिक स्थिती | २७ |
| पुरूष आणि स्त्रीची सुरक्षितता | ३३ |
| पवित्र प्रेषितांची काहीं वचने | ३८ |
| **संदर्भसूची** | ४२ |

## काहीं संक्षिप्त शब्दः

खालील मराठी मजकूरात आलेल्या अरबी शब्दांचे संक्षिप्त अक्षरे दिलेली आहेत, त्यांचे अर्थ व स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहेत:-

(स.) - हे अक्षर 'सल्लल्लाहु अलैहिवसल्लम' याचे संक्षिप्त रूप म्हणून आहे. याचा अर्थ, अल्लाहची कृपा व शांती त्यांना लाभो, असा होतो. हे प्रार्थनात्मक शब्द विशेषकरून पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) साठी वापरले जाते.

(अ.स.) - 'अलैहिस्सलाम' प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या व्यतिरिक्त जगात प्रकट झालेल्या सर्व प्रेषितांचा नाव उच्चारल्यावर (अ.स.) म्हणतात. याचा अर्थ, त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो, असा होतो.

(र.ज.) - हे अक्षर 'रज़ियल्लाहु अन्हु' याचे संक्षिप्त रूप आहे. याचा अर्थ ' अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला' असा होतो. हे शब्द प्रेषित मुहम्मद (स.) तसेच 'अपेक्षित मसीह व इमाम महदी' यांच्या पुरूष सोबतींच्या नावानंतर उच्चारले जातात; तर (र.जि.) अर्थात 'रज़ियल्लाहु अन्हा' हे महिलांसाठी वापरले जाते.

## प्रस्तावना

अनेक समाजांमध्ये आज देखील स्त्रीला दुय्यम दर्जाचे नागरिक मानले जाते आणि तिला पुरूष उपभोगत असलेल्या अनेक अधिकारांपासून वंचित ठेवले जाते. या पक्षपाती वागणूकीला विरोध करण्यासाठी आणि समाजांमध्ये समान दर्जा प्राप्त करण्यासाठी स्त्रीयांनी मोठे लढे उभारले, परंतु दुर्दैवाने अद्यापपावेतो अतिशय पुढारलेल्या पाश्मात्य देशात देखील हे ध्येय साध्य करता आलेले नाही. या उलट दुसरे टोक गाठताना स्त्रीयांना आधुनिक समाजात मोकाटपणे वावरण्याचा परवाना देताना पाश्मित्य समाज मुस्लिम स्त्रीयांना नेहमीच पुरूष प्रधान जगात अतिशय मागासलेले समजत आला आहे.

उलटपक्षी, इस्लाम हा जगातील पहिला असा धर्म आहे, ज्याने अधिकृतपणे स्त्रीला असा दर्जा दिला, ज्याची तिने पूर्वी कधीही कल्पना केली नव्हती. इस्लामची पवित्र संहिता, अर्थात पवित्र कुरआना मध्ये या संदर्भात अनेक अशा शिकवणी आहेत, ज्या स्त्री आणि पुरूष, दोघांना समानपणे लागू होतात. नैतिक, आध्यात्मिक आणि आर्थिक बाबतीत पुरूष आणि स्त्रीला, जी समानता इस्लामने प्रदान केली आहे, ती निःसंदिग्ध आणि वादातित आहे. पवित्र कुरआनाच्या विशिष्ट आयती, ज्या पुरूष आणि स्त्रीयांच्या संदर्भात आल्या आहेत, त्या एक तर त्यांच्या शारीरिक भिन्नतेच्या संदर्भात आहेत किंवा ज्या प्रकारचा समाज इस्लाम निर्माण करू इच्छितो, त्याचा नैतिक धागा टिकविण्याच्या

संदर्भात, उभयतांनी जी भूमिका बजावणे आवश्यक आहे, त्या संदर्भात आहे.

ही छोटी पुस्तिका, जी बहुतांश पवित्र कुरआनाच्या मूलभूत शिकवणीवर आधारलेली आहे, ती मुस्लिम स्त्रीला, जे अधिकार बहाल करते त्या संदर्भात आहे. तसेच जी विभिन्न प्रकारची त्यांची कर्तव्ये, इस्लामच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत, विवाह, घटस्फोट आणि बहुपत्नीत्व, यांची संकल्पना आणि त्याद्वारे सामाजिक आणि नैतिक आदर्शांचे संरक्षण, इस्लाम कशाप्रकारे करतो या संदर्भात आहेत. मी सर मुहम्मद ज़फरूल्लाह खान साहेब यांनी, ज्या विषयावर पाश्चात्य जगात अनेक गैरसमज पसरलेले आहेत, तो विषय या पुस्तिकेत समर्पकपणे मांडल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानतो.

सर मुहम्मद ज़फरूल्लाह खान साहेब द्वारा लिखित या पुस्तकाचे मराठी भाषांतर मा. डॉ. बशारत अहमद साहेब यांनी केले आहे आणि तद्पश्चात मा. खान मामून अहमद (इंचार्ज मराठी विभाग), श्री. अमतुस सलाम कौनेन (एम.ए.) यांनी या पुस्ताकचे मुद्रितशोधन केले आहे. अल्लाह या सर्वांना त्यांच्या प्रयत्नांचे उत्तम प्रतिफल देवो.

हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद, मसीहाचे पाचवे खलीफा व सद्यकालीन धर्मगुरू (अल्लाह सदैव त्यांचा सहाय्यक असो) यांच्या स्वीकृतीने या पुस्ताकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध करण्यात येत आहे.

विनीत

हाफ़िज़ मख़दूम शरीफ

सचिव, मुद्रण व प्रकाशन विभाग, क़ादियान.

# इस्लाम मध्ये स्त्रीचे स्थान

स्त्री आणि पुरूषांमधील परस्पर संबंधांना नियंत्रित करण्यासाठी जी दैवी व्यवस्था आहे, इस्लामने त्या बाबतीत स्त्रीला अतिशय प्रतिष्ठित आणि आदरणीय स्थान प्रदान केले आहे. अशा प्रकारचे प्रागतिक नियंत्रण मानव जातीच्या शांती, सुविधा, आनंद, प्रगती आणि संवर्धनासाठी अतिशय आवश्यक आहे.

पवित्र कुरआन मध्ये ही गोष्ट अतिशय ठासून मांडली आहे की, परमेश्वराने त्याच्या परिपूर्ण विवेकानुसार सर्व प्रजातींच्या जोडया निर्माण केल्या आहेत, आणि म्हणून पुरूष आणि स्त्री सुद्धा अशाच प्रकारे जोडीने निर्माण करण्यात आले आहेत. जसे की, पवित्र कुरआन म्हणतो,

''त्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले आहे पुढे त्या मधूनच त्याने त्याचे जोडपे निर्माण केले.'' (३९:७)

''त्याने तुमच्यासाठी तुमच्यासारखेच जोडीदार निर्माण केले. ''(४२:१२)

''हे लोकहो! तुमच्या विधात्याचे भय बाळगा, ज्याने तुम्हाला एका जीवातून निर्माण केले आणि त्यातूनच त्याने त्याचे जोडपे निर्माण केले. आणि त्या दोघांपासून अनेक स्त्री व पुरूष निर्माण करून (जगभर) पसरवले.'' (४:२)

''तोच आहे ज्याने तुम्हाला एका जीवातून निर्माण केले आहे,

आणि त्यातूनच त्याची (एक) जोडीदार तयार केली, जेणेकरून त्यास तिच्यामध्ये संतोष प्राप्त व्हावा.'' (७:१९०)

''आणि त्याच्या संकेतांपैकी (एक संकेत असा आहे) की, त्याने तुमच्यामधूनच तुमच्यासाठी सहचरिणी बनवल्या आहेत (त्या) यासाठी की, तुम्हाला त्यांच्यामध्ये मनःशांती लाभावी, आणि त्याने तुम्हा परस्परात, प्रेम आणि करूणा निर्मिली, यामध्ये निःसंशय चिंतन करणारांसाठी संकेत आहेत.'' (३०:२२)

इस्लाम अशी शिकवण देतो की, मानवाला ज्या क्षमता आणि सामर्थ्ये, दैवी अनुग्रहाच्या स्वरूपात परमेश्वराने प्रदान केले आहेत, त्यांचा वापर कल्याणकारी पद्धतीने करणे आवश्यक आहे.

''आणि अल्लाहने तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरांतून अशा अवस्थेत बाहेर काढले, जेव्हा तुम्ही काही जाणत नव्हता, आणि त्यानेच तुम्हाला कान, डोळे आणि हृदय दिले, यासाठी की, तुम्ही कृतज्ञ व्हावे.'' (१६:७९)

याचा अर्थ असा होतो की, त्या क्षमतांचा वापर यथायोग्य वेळी आणि यथायोग्य स्थानी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे त्यांचे संवर्धन आणि गुणवर्धन होईल. परंतु त्याचा गैरवापर किंवा त्याकडे दुर्लक्ष केल्याने दैवी प्रकोप होतो.

काहीं धर्मांमध्ये, चूकीच्या धारणांनुसार सन्यासवृत्तीला वैवाहिक जीवनापेक्षा, आध्यात्मिक दृष्टिने, उच्चकोटीचे मानले जाते. इस्लाम सन्यासवृत्तीला नकारतो आणि धिक्कारतो. पवित्र कुरआनात म्हटले आहे,

''त्यांनी तो वैराग्याचा (मार्ग) शोधून काढला, जो त्यांच्यासाठी

आम्ही विहित केला नव्हता.'' (५७:२८)

मठवासाची (सन्यासीवृत्तीची) संपूर्ण संकल्पना ही अशा चूकीच्या धारणेवर आधारलेली आहे की, स्त्री ही हीन दर्जाची निर्मिती असून, तिच्याशी संबंध ठेवल्याने मानसाचा दर्जा खालावतो आणि नैतिक पतन होते. चर्चच्या अधिपतींनी असा नियम पुरूषांसाठी केला की, त्यांनी स्त्रीकडे आकर्षित होऊ नये आणि स्त्रीला एक निर्जीव वस्तू आणि सैतानाचे साधन आणि उपकरण मानले आहे.

इस्लामने या वृत्तीचे खंडन केले आणि स्त्रीचा दर्जा उंचावत तिला पुरूषाच्या बरोबरीचे आध्यात्मिक स्थान प्रदान केले. त्याने असे प्रतिपादन केले की, पुरूष आणि स्त्री परस्पर पूरक असून ते एकमेकाच्या परिपूर्णतेचे साधन आहेत. उदाहरणार्थ पवित्र कुरआन म्हणतोः

''त्या तुमच्यासाठी वस्त्रप्रावरणे आहेत, आणि तुम्ही त्यांच्यासाठी वस्त्रप्रावरणे आहात.'' (२:१८८)

## आध्यात्मिक समानता

पवित्र कुरआनामध्ये स्त्रीची पुरूषाबरोबर आध्यात्मिक समानता दर्शविण्यासाठी वारंवार भर देण्यात आला आहे. उदाहरणार्थः

''निश्चितच (ईश्वराच्या) शरणागत पुरूष व शरणागत स्त्रिया आणि श्रद्धावंत पुरूष व श्रद्धावंत स्त्रिया, व आज्ञाधारक पुरूष व स्त्रिया, आणि सत्यभाषी पुरूष व सत्यभाषिणी स्त्रिया, आणि (निष्ठेच्या बाबतीत) धैर्यशील पुरूष व धैर्यशील स्त्रिया आणि पुरूष जे विनम्र आहेत व स्त्रिया ज्या विनम्र आहेत, आणि पुरूष जे दान देतात व स्त्रिया ज्या दान देतात व उपवास पाळणारे पुरूष व उपवास पाळणाऱ्या

स्त्रिया, आणि स्वतःचे शील रक्षण करणारे पुरूष व स्वतःचे शील रक्षण करणाऱ्या स्त्रिया, आणि अल्लाहचे सतत नामस्मरण करणारे पुरूष, स्त्रिया या (सर्वांसाठी) अल्लाहने क्षमा व महान पुण्यफल तयार ठेवलेले आहे.''(३३:३६)

पुरूष आणि स्त्रिया यांना समान संरक्षण देण्यात आले आहे. उदाहरणार्थः

''आणि जे लोक श्रद्धावंत पुरूषांना व श्रद्धावंत स्त्रियांना त्यांचा कोणाताही अपराध नसताना दोष देतात, त्यांनी भयंकर असत्याच्या दोषांचे व उघडउघड पापाचे ओझे आपल्यावर घेतल्यासारखे आहे.'' (३३:५९)

''जे (लोक) श्रद्धावंत पुरूषांना व श्रद्धावंत स्त्रियांचा छळ करतात, व नंतर (त्याबद्दल) पश्चाताप पावत नाहीत, त्यांच्यासाठी खचितच नरकाची शिक्षा (नियत) आहे, व त्यांच्यासाठी जळण्याची शिक्षा (नियत) आहे.'' (८५:११)

हुदैबिया येथे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भात म्हटले आहे की,

''आणि त्याठिकाणी असे काही श्रद्धावंत पुरूष व श्रद्धावंत स्त्रिया नसत्या, ज्यांना तुम्ही ओळखत नव्हता, आणि ज्यांना तुम्ही चिरडून टाकले असते आणि त्यांच्यामुळे अजाणतेपणी तुमच्याकडे दोष आला असता, तर (त्याने तुम्हाला लढण्याची अनुमती दिली असती, परंतु त्याने यासाठी असे केले नाही) की, ज्यास इच्छील त्यास आपल्या कृपाछत्राखाली घेता यावे. जर त्यांना (श्रद्धाहीनांपासून) वेगळे काढण्यात आले असते, तर त्यांच्यापैकी जे श्रद्धाहीन होते त्यांना आम्ही

खचितच दुःखदायक शिक्षा केली असती.'' (४८:२६)

स्त्रिया पुरूषांपेक्षा जास्त असुरक्षित असल्यामुळे त्यांना विशेष सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे.

''निःसंशय, जे लोक निष्कलंक, अजाण, श्रद्धावंत स्त्रियांवर आरोप करतात, ते इहलोकात आणि परलोकातही धिक्कारले जातील, आणि त्यांच्यासाठी फार मोठी शिक्षा नियत आहे; ज्यादिवशी त्यांच्या जिभा, त्यांचे हात आणि त्यांचे पाय त्यांच्याविरूद्ध, ते जे काही करीत होते याविषयी साक्ष देतील.'' (२४:२४,२५)

पारलौकिक जीवनात स्त्री आणि पुरूष दोघांनाही समान पुण्यफल दिले जाईल.

''परंतु जो कोणी सत्कर्म करील, मग तो पुरूष असो वा स्त्री, आणि तो श्रद्धावंत असेल, तो स्वर्गात प्रविष्ट होईल, आणि त्याच्यावर खजुराच्या बीच्या मागील बाजूस जी छोटीशी रेघ असते (तेवढा देखील) अन्याय होणार नाही.'' (४:१२५)

''जो कोणी सदाचाराने वागत असेल, मग तो पुरूष असो वा स्त्री, आणि श्रद्धावंत असेल, त्यास आम्ही निर्मळ जीवन प्रदान करू; आणि अशांना आम्ही त्यांच्याउत्तम कर्मांनुसार त्यांचा मोबदला निश्चितच प्रदान करू.'' (१६:९८)

''आणि जो कोणी कल्याण करतो, मग तो पुरूष असो वा स्त्री, आणि श्रद्धावंत असेल तर असे (लोक) (स्वर्गीय) उपवनात दाखल होतील, तेथे त्यांना अमाप उपजीविका देण्यात येईल.'' (४०:४१)

''आणि श्रद्धावंत पुरूष व स्त्रिया हे एकमेकांचे मित्र आहेत. ते सत्कृत्याचा आदेश देतात आणि दुष्कृत्यास प्रतिबंध करतात व प्रार्थना

करतात (नमाज पढतात) व दान (जकात) देतात आणि अल्लाहच्या व त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करतात. हेच लोक आहेत, ज्यांच्यावर अल्लाह कृपा (वर्षाव) करील. निःसंशय, अल्लाह, हा सामर्थ्यशाली व बुद्धिवंत आहे. अल्लाहने श्रद्धावंत पुरूष व आणि स्त्रिया यांना अशा उपवानाचे वचन दिलेले आह की ज्यांखाली नद्या वाहात असतील, त्यांत ते सदैव वास्तव्य करतील, आणि या शाश्वत उपवनंमध्ये आनंददायी घरांचेही (वचन दिलेले आहे). आणि अल्लाहची प्रसन्नता हीच सर्वात मोलाची गोष्ट होय. ती सर्वश्रेष्ठ सफलता होय.'' (९:७१,७२)

''(श्रद्धेची भर यासाठी) की त्याने श्रद्धावंत पुरूष आणि श्रद्धावंत स्त्रियांना (अशा) उपवनांमध्ये प्रविष्ट करावे ज्यांखाली जलप्रवाह वाहात आहेत, ज्यांमध्ये ते (सदैव) निवास करतील, आणि त्याने त्यांची पापे दूर करावीत - आणि अल्लाहच्या संन्निध ही फार मोठी सफलता आहे.'' (४८:६)

''त्यांच्या विधात्याने त्यांच्या (प्रार्थनेस) प्रतिसाद देऊन (म्हटले की), तुमच्यातील कोणत्याही कर्मकाचे कर्म – मग ते पुरूष असो अथवा स्त्री, मी वाया जाऊ देणार नाही. तुम्ही एक दुसऱ्याशी सलग्न आहात.''

''हे माझ्या सेवकांनो, आज तुम्हाला कोणत्याही प्रकारचे भय नाही, आणि तुम्ही शोकग्रस्त होणार नाही, तुम्ही आणि तुमच्या पत्नी आनंदी होऊन उपवनात प्रवेश करा.'' (४३:६९-७१)

''खरोखर, त्यादिवशी स्वर्गात वास्तव्य करणारे लोक (आपल्या) निवासस्थानी आनंदात असतील. ते आणि त्यांच्या सहचारींणी सुखद छायेखाली उच्चासनावर विराजमान झालेले असतील. त्यात त्यांना फळे

मिळतील, आणि त्यांना ते, जे जे काही मागतील ते सर्व मिळेल.'' (३६:५६-५८)

''आणि त्या दिवसाचा (विचार करा) जेव्हा श्रद्धावंत पुरूष व स्त्रिया, यांना तू (अशा अवस्थेत) पाहशील की, त्यांचा प्रकाश त्यांच्यापुढे व त्यांच्या उजव्या बाजूस धावत असेल, (आणि त्यांना असे सांगण्यात येईल की), आज तुम्हाला (कित्येक) शुभवार्ता देण्यात येत आहेत! (स्वर्गीय) उपवने ज्यांच्यामधून जलप्रवाह वाहत आहेत, त्यांमध्ये तुम्ही वास्तव्य कराल. तेच फार मोठे यश आहे.'' (५७:१३)

पवित्र पैगंबरांना श्रद्धावान पुरूषांप्रमाणेच श्रद्धावान स्त्रीयांना देखील क्षमा प्रदान करावे, यांच्यासाठी देखील क्षमायाचना करावी, असा आदेश प्राप्त झाला होता.

## श्रम विभागणी

दैवी व्यवस्थेमध्ये, त्यांच्या सर्व पैलूमध्ये, ईश्वरीय विवेकाचा प्रत्यय दिसतो. पुरूष आणि स्त्रिया आध्यात्मिक दृष्टिने परस्परावलंबी असून त्यांच्यावर परमेश्वराची कृपा आणि अनुग्रह समप्रमाणात झाला आहे, परंतु त्यांची कर्तव्ये एकसमान नाहीत. या विभिन्नतेच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यांच्या क्षमता आणि गुणविशेषांमध्ये विभिन्नता दिसून येते. या गोष्टीकडे निर्देश करताना पवित्र कुरआनात म्हटले आहे की,

''(त्यावर) त्याने म्हटले (की), आमचा विधाता तो आहे ज्याने प्रत्येक वस्तूस तिचे (योग्य ते) स्वरूप दिले आहे (आणि) मग (तिला तिचे योग्य ते काम करण्याचा) मार्ग दाखवला आहे.'' (२०:५१)

''हा अल्लाहने निर्मिलेला स्वभाव आहे व त्या स्वभावास

अनुसरून त्याने मनुष्यास घडवले आहे.'' (३०:३१)

पुरूषाला स्त्रीमध्ये परावर्तित करणे आणि स्त्रीला पुरूषामध्ये परावर्तित करण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ आणि विनाशकारी ठरले आहेत. प्रत्येकाला त्याचे किंवा तिचे यथायोगय कर्म आहेत, ज्यांचा यथायोग्य वापर करण्यात प्रतिष्ठा, आनंद, परिपूर्णता आणि जीवनाचे सौंदर्य आहे.

स्त्री आणि पुरूषांच्या श्रम विभागाकडे सखोल दृष्टिने पाहिल्यानंतर त्यांच्या नैसर्गिक क्षमतांच्या विभिन्नतेचा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ, स्त्री ही मूलांना जन्म देण्यासाठी पूर्णतः सक्षम आहे, याउलट पुरूषांमध्ये ही क्षमता नाही. दुसऱ्या बाजूने पाहिल्यास पुरूष हा मैदानी कर्तव्य बजावण्यात पूर्णतः सक्षम आहे, जर का स्त्रीयांना सैनिक विभागामध्ये नियुक्त केल्यास ते विनाशाला आमंत्रण देण्यासारखे होईल. हा प्रश्न उच्च दर्जाचा किंवा हीन दर्जाचा नसून, हा प्रश्न नैसर्गिक क्षमतांचा आणि यथायोग्य कार्यप्रणालीचा आहे.

मूल जन्माला घालण्याच्या यथायोग्य कर्तव्य बजावणीमुळे, स्त्रीया काहीं बाबतीत विकल होतात, ज्यांपासून पुरूष पूर्णतः मुक्त आहेत. परंतु मातृत्वाचा मुकूट धारण करण्याचा बहूमान आणि प्रतिष्ठा स्त्रीसाठी राखीव आहे, ते पुरूषाला कधीही प्राप्त होऊ शकत नाही. मुलांच्या बालवयातील संवर्धन आणि संगोपनाची प्रार्थमिक जबाबदारी आई वर असते, या अवस्थेत पित्याची जबाबदारी ही दुय्यम स्वरूपाची असते. त्याकाळात मूल हे नैसर्गिकरित्या पित्यापेक्षा, संवर्धन, सुविधा आणि सुरक्षेच्या बाबतीत आईवर अधिक विसंबून असते. जेव्हा एखाद्या मुलाला त्याची आई खडसावते किंवा शिस्त लावण्याच्या बाबतीत सक्ती करते, तेव्हा त्याच्या मनात आईबद्दल संतापाची भावना निर्माण

होत नाही. परंतु पित्याने सक्ती केली, तर त्याला संताप येतो. आई आणि मुलांच्या मधील जो नैसर्गिक बंध निर्माण झालेला असतो, तो पिता आणि मुलांमधील निर्माण होणाऱ्या बंधापेक्षा खूप जास्त कोमल असतो.

स्त्री ही दुर्बल असते आणि तिला तिच्या सुरक्षिततेसाठी पुरूषाच्या सामर्थ्य आणि मदतीची गरज असते. एखाद्या स्त्रीला तिच्या मर्जी विरूद्ध बळजबरी केली जाऊ शकते; परंतु पुरूषाच्या बाबतीत हे सहसा शक्य होत नाही.

पत्नी आणि आई म्हणून स्त्रीचे सामान्य आणि प्राथमिक कार्यक्षेत्र, हे तिचे घर असते, आणि उपजीविका प्राप्त करण्यासाठी सामान्यपणे पुरूषाचे कार्यक्षेत्र, हे घराबाहेर असते. ही सामाजिक व्यवस्था, जी विवेकावर आणि कल्याणकारही व्यवस्थेवर आधारलेली आहे, ती दोघांमध्ये संतुलन आणि सुसंवाद स्थापन करण्यास सहाय्यभूत असते. इस्लाम ती स्थापन करण्याचा दावा करतो.

## विवाह

इस्लाम धर्मामध्ये विवाहाचा अंतिम आणि परम उद्देश पावित्र्य, परिपूर्णता, संतोष आणि वंशवृद्धी, या माध्यमातून परमेश्वराची मर्जी संपादन करणे, हे आहे. उदाहरणार्थ, खऱ्या श्रद्धावंताच्या गुणविशेषांपैकी, विवाहाच्या माध्यमातून पावित्र्य जपणे, या सोबतच काटेकोरपणे आणि नम्रपणे उपासना करणे, निरर्थक गोष्टींचा त्याग करणे, ज़कात (धर्मदान) अदा करणे, विश्वास संपाद करणे आणि वचन पूर्ती करणे.

''हेच खरे असे वारस आहे, ज्यांना स्वर्गाचा वारसा मिळेल. ते

त्यात निवास करतील.'' (२३:११-१२)

पुढे याबाबत मार्गदर्शन आहे कीः

''आणि तुमच्यामध्ये असलेल्या विधवा, आणि (विवाहासाठी) योग्य असलेले तुमचे दास आणि दासी, यांचे विवाह करून द्या. जर ते निर्धन असतील तर अल्लाह आपल्या कृपेने त्यांना निर्वाहसाधन देईल.'' (२४:३३)

पवित्र पैगंबरांचे वचन आहे कीः

''वैवाहिक जीवन हा आमचा मार्ग आहे, जो आमच्या मार्गापासून विन्मुख होतो, तो आमच्यापैकी नाही.''[१]

दुर्दैवाने पाश्चात्य जगामध्ये लैंगिक पावित्र्याला सद्गुण मानले जात नाही, त्याच्या ऐवजी प्रायोगिक तत्त्वावर सहजीवन आणि अनेक व्यक्तिंशी लैंगिक संबंध ठेवणे, ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. वैवाहिक आणि विवाह बाह्य जीवनामध्ये लैंगिक विकृती आणि वासनांधता, हेच लैंगिक संबंधाचे मूळ उद्देश मानले जात आहे. स्त्रीला फक्त वासना पूर्तीचे एक साधन मानून तिची अवहेलना केली गेली आहे.

इस्लामनुसार पती आणि पत्नीचे संबंध हे एकमेकाची प्रतिष्ठा प्रस्थापित करणारे मानले गेले आहेत. पवित्र कुरआन मध्ये निर्देश आहे कीः

''त्यांच्याशी चांगूलपणाने वागा, आणि त्या तुम्हाला पसंत नसतील तर (लक्षात ठेवा) ज्या गोष्टीमध्ये अल्लाहने (तुमच्यासाठी) पुष्कळसे हित ठेवलेले आहे ती गोष्ट तुम्ही नापसंत करीत असल्याची शक्यता आहे.'' (४:२०)

वैवाहिक संबंधाची वैशिष्ट्ये, पवित्र प्रेषितांच्या खालील वचनांनुसार तपासले जाऊ शकतातः

''जेव्हा तुम्ही एकत्र येता, तेव्हा प्रार्थना करा की, हे अल्लाह आम्हाला सैतानापासून सुरक्षा प्रदान कर आणि जी गोष्ट तू आम्हाला प्रदान करणार आहेस त्यापासून सैतानाला दूर ठेव.''[२]

जसे की, पूर्वी नमूद केले आहे की, पती आणि पत्नी यांना एकमेकाचे वस्त्रप्रावरणे मानले गेले आहे (२:१८८) अर्थात सुरक्षा, प्रतिष्ठा आणि आभूषण.

वैवाहिक संबंधांचा संपूर्ण विषय, हा इस्लाम मध्ये अतिउच्च पातळीवर नैतिक आणि आध्यात्मिक संवेदनशीलता, ज्यातून निव्वळ शारीरिक संबंधांना पूर्णपणे वगळले गेले आहे, ही गोष्ट खालील आयतीमध्ये अतिशय स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे.

''आणि ते तुला ऋतुस्त्रावाविषयी विचारीत आहेत (तू त्यांना असे सांग) की, ती एक हानिकारक गोष्ट आहे, म्हणून ऋतुस्त्रावाच्या काळात स्त्रियांपासून दूर रहा, आणि जोपर्यंत त्या (शुद्ध व) स्वच्छ होत नाहीत तोपर्यंत त्यांच्याजवळ जाऊ नका. तथापि त्यांनी स्वतःस स्वच्छ केल्यानंतर अल्लाहने जशी तुम्हाला आज्ञा केलेली आहे, त्यानुसार त्यांच्याकडे जा. अल्लाह जे त्यांच्याकडे वळतात त्यांच्यावर प्रेम करतो आणि जे स्वतःस (शुद्ध व) स्वच्छ ठेवतात त्यांच्यावर (ही) प्रेम करतो.'' (२:२२३)

''तुमच्या पत्नी या तुमच्यासाठी एक (प्रकारच्या) कसलेल्या जमिनी आहेत, म्हणून तुम्हाला जेव्हा व जसे आवडेल तेव्हा व तसे आपल्या जमिनीकडे जा आणि तुमच्या करता (काही चांगले) पुढे

पाठवून द्या, आणि अल्लाहचे भय बाळगा आणि तुम्हाला त्याच्यासमोर जायचे आहे हे लक्षात ठेवा, आणि जे आज्ञा पाळतात त्यांना शुभवार्ता दे.'' (२:२२४)

कोणतेही असे वर्तन ज्यामुळे स्त्रीची जनन क्षमता बाधित होऊ शकते अशा वर्तनाला अमान्य करण्यात आले आहे. शुद्धता आणि धर्मपरायणता (तक़्वा) ही कुठल्याही परिस्थितीमध्ये ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. पवित्र कुरआनामध्ये सन्मार्गींना उद्देशून म्हटलेली प्रार्थना खालील प्रमाणे आहेः

''हे आमच्या विधात्या, आमच्या पत्नी आणि आमची संतती यांच्याकडून आम्हाला आमच्या नेत्रांचे सुख प्रदान कर, आणि (अल्लाहचे) भय बाळगणाऱ्यांमध्ये आम्हाला अग्रणी बनव.'' (२५:७५)

## पती आणि पत्नींचे कर्तव्ये आणि दायित्वे

इस्लामी व्यवस्थेमध्ये विवाह हा दिवानी स्वरूपाचा असा करारनामा आहे, ज्यात परस्पर दायित्वांचा पूर्ण समावेश आहे. त्याच्या वैधतेसाठी जाहीर प्रकटनाद्वारे दोन्ही पक्षांची संमती, तसेच वधूच्या पालकाची संमती, ज्याच्यावर वधूच्या संपूर्ण अधिकारांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आहे, तसेच नवऱ्याकडून त्याच्या क्षमतेनुसार पत्नीला योग्य अशी वधुदक्षिणा (मेहेर) निश्चित करणे आवश्यक आहे. आणि ही गोष्ट वधूचा पिता किंवा पालकाकडून दिल्या जाणाऱ्या हुंडयाबरोबर जोडून पाहण्याची चूक करू नये.

विवाहासाठी निषिध संबंधाची सुस्पष्ट चर्चा खाली करण्यात आली आहे.

''आणि वर नमूद केलेल्या स्त्रियांव्यतिरिक्त असतील व त्यांच्याशी व्याभिचार करून नव्हे तर रीतसर मार्गाने विवाह करून तुमच्या धनसंपत्तीच्या सहाय्याने तुम्ही त्यांना प्राप्त करत असाल, तर अशा स्त्रियांशी विवाह करण्यास तुम्हाला अनुमती आहे. आणि तुम्हाला त्यांच्यापासून मिळत असलेल्या लाभाच्या बदल्यात तुम्ही त्यांना निश्चित केलेली वधुदक्षिणा द्या, आणि वधुदक्षिणा निश्चित केल्यानंतर तुम्ही आपसात ज्या गोष्टीस मान्यता द्याल त्या (गोष्टीमुळे) तुम्हाला कोणतेही पाप लागणार नाही. खरोखर, अल्लाह हा सर्वज्ञ (व) ज्ञानी आहे.'' (४:२५)

पती आणि पत्नी या दोघांची एकमेकांप्रती असलेली दायित्वे सुस्पष्ट आहेत, परंतु पती हा उपजीविका पूरविणारा असल्यामुळे त्याच्यावर पत्नी आणि कुटुंबासाठी उपजीविकेची साधने पूरवणे बंधनकारक आहे. म्हणून घर चालविताना जर काही मतभेद निर्माण झाले, तर पती

चा शब्द शेवटचा मानला जावा, जेणे करून कुटुंब व्यवस्था सुरळीत रहावी.

''.... आणि पुरूषांचे जसे (स्त्रियांच्या बाबतीत) अधिकार आहेत (आणि) तसेच (अधिकार) त्यांना (स्त्रियांना पुरूषांच्या) बाबतीत आहेत, तथापि पुरूषांना त्याबाबतीत त्यांच्यावर (स्त्रियांवर) (थोडेसे) वरचे स्थान आहे. आणि अल्लाह हा सर्व शक्तिमान आणि ज्ञानवान आहे.'' (२:२२९)

स्त्री ही नैसर्गिकपणे शारीरिक क्षमतांच्या बाबतीत दुर्बल आणि नाजूक असल्यामुळे, ती अत्याचाराचा शिकार होऊ शकते, म्हणून पुरूषाला तिचा सुरक्षा रक्षक नियुक्त केले गेले आहे.

''अल्लाहने त्यांच्यापैकी काहींना इतरांपेक्षा श्रेष्ठत्व दिलेले असल्याने, आणि ते त्यांची धनसंपत्ती खर्च करीत असल्याने, पुरूष हे स्त्रियांचे प्रतिपालक आहेत, म्हणून ज्या स्त्रिया आज्ञाधारक आहेत आणि अल्लाहच्या आश्रयाने त्या आपल्या पतींच्या गुप्त गोष्टी सुरक्षित ठेवीत आहेत त्याच खऱ्या सद्‌वर्तनी स्त्रिया होत.'' (४:३५)

पत्नी जर सातत्याने असहकार करत कुटुंबाची सुख शांतता बाधित करत असेल, तर पतीने स्वतःहून तिला उपदेश करावा, जर त्या उपदेशाचा उपयोग झाला नाही तर त्याने तिला काहीं काळासाठी स्वतःपासून विभक्त ठेवावे आणि शेवटी नाईलाज झाल्यास अल्पशी शारीरिक शिक्षा द्यावी. (४:३५)

''आणि जर एखाद्या स्त्रीला आपल्या पतीकडून आपल्यावर अत्याचार होण्याचे किंवा उदासीनता दाखवली जाण्याचे भय वाटत असेल, तर त्यांनी आपसात योग्य रीतीने त्याबाबतीत समझोता केल्यास, त्याचे कोणतेही नुकसान नाही, आणि समझोता करणे हे सर्वोत्तम आहे. आणि लोभीपणा ही लोकांची प्रवृत्ती झालेली आहे. तुम्ही जर सत्कर्म कराल आणि सदाचरणी असाल तर अल्लाह तुम्ही जे काही करता, त्याची निश्चितच जाणीव ठेवतो.'' (४:१२९)

जर परस्पर संवादातून सामंजस्य निर्माण होत नसेल, तर समूपदेशकांचे सहाय्य घेण्यात यावे.

''आणि जर तुम्हाला त्या (दोघांमधील) संबंध बिघडण्याची भीती वाटत असेल, तर त्याच्या नातेवाइकांमधून एक पंच आणि तिच्या नातेवाईकांमधून एक पंच नियुक्त करा. त्यांची जर समेट घडवून आणण्याची इच्छा असेल, तर अल्लाह त्यांच्यामध्ये तो घडवून आणील.

खरोखरच अल्लाह हा सर्वज्ञ आणि सर्व गोष्टींची जाणीव असलेला आहे.'' (४:३६)

## घटस्फोट

जर सामंजस्य निर्माण करण्याचे सर्वच प्रयत्न निष्फळ ठरत असतील, तर विवाह विच्छेद करणे हाच एक मार्ग उरतो. ही गोष्ट सुस्पष्टपणे ध्यानात घ्यावी, की इस्लाम विवाह विच्छेदाला पसंती देत नाही. पवित्र पैगंबरांनी म्हटले आहे की, ''ज्या गोष्टींची मुभा देण्यात आली आहे, त्यापैकी अल्लाहला सर्वात अप्रीय गोष्ट घटस्फोट हा आहे.''[३]

घटस्फोटाची मागणी पती किंवा पत्नीकडून सुद्धा केली जाऊ शकते. मागणी पत्नीकडून होत असेल, तर त्यासाठी वैधानिक मार्गाचा अवलंब करणे श्रेयस्कर आहे, जेणेकरून पत्नीच्या संपूर्ण अधिकारांचे संरक्षण केले जाईल.

जर मतभिन्नता निर्माण झाली असेल आणि सामंजस्य निर्माण करणे शक्य नसेल, तर पती-पत्नी पासून विभक्त होण्याचा निर्णय जाहीर करतो, अशा परिस्थितीमध्ये, चार महिन्याच्या कालावधीमध्ये ही परिस्थिती निकाली निघायला हवी.

''जे लोक आपल्या पत्नींपासून (अलग होण्याची) प्रतिज्ञा धरतात त्या लोकांसाठी प्रतिक्षा करण्याचा (जास्तीत जास्त) कालावधी चार महिने इतका आहे; त्यानंतर जर त्यांनी आपली प्रतिज्ञा मागे घेतली तर निश्चितच अल्लाह हा अतिशय क्षमाशील (आणि) दयाळू आहे. आणि जर त्यांनी घटस्फोटाचा निर्णय घेतला तर निःसंशय अल्लाह हा

सर्व काही ऐकणारा व सर्वज्ञ आहे.'' (२:२२७-२२८)

घटस्फोटाच्या संदर्भात परिपूण अशी नियमावली आहे आणि ही नियमावली अशा पद्धतीने तयार करण्यात आली आहे, जेणे करून घटस्फोट हा सहजासहजी किंवा भावनेच्या भरात किंवा कटूतेची परिणीती म्हणून अंमलात येऊ नये. हा निर्णय अतिशय गांभिऱ्याने आणि विचारपूर्वक आणि त्याचे जे परिणाम उभयतांवर आणि अपत्यांवर, (जर विवाह नंतर अपत्य झाले असतील तर) होऊ शकतात, याच्या पूर्ण विचारांत घेतला जायला हवा. ही परिणीती ध्यानात घेऊन घटस्फोटाची प्रक्रिया अशा पद्धतीची आहे की, जेणे करून उभयतांना शांत चित्ताने परस्पर सामंजस्य निर्माण करण्याची पूर्ण संधी, घटस्फोट अटल होण्यापूर्वी मिळावी.

''अशा प्रकारच्या तलाकच्या (घोषणा) दोनदा करता येईल, त्यानंतर एकतर (त्यांना) उचित रीतीने ठेवून घ्या किंवा स्नेहपूर्वक (त्यांना) पाठवून द्या. आणि दोघांनाही अल्लाहने (ठरवून दिलेल्या) मर्यादांचे आपल्याला पालन करता येणार नाही असे भय असेल तर, तुम्ही त्यांना (तुमच्या पत्नींना) जे काही दिलेले आहे त्यपैकी कोणताही भाग तुम्ही परत घेणे तुमच्या दृष्टीने उचित ठरणार नाही. परंतु अल्लाहने (ठरवून दिलेल्या) मर्यादांचे ते पालन करू शकणार नाहीत, अशी भीती तुम्हाला वाटत असेल तर, ती स्त्री स्वतःच्या मुक्ततेसाठी, जे काही देईल त्यांच्याबाबतीत दोघांपैकी कोणालाही पाप लागणार नाही. या अल्लाहने (ठरवून दिलेल्या) मर्यादा आहेत, म्हणून त्यांचे उल्लंघन करू नका; आणि जे कोणी अल्लाहने (ठरवून दिलेल्या) मर्यादांचे उल्लंघन करतील ते लोकच (वास्तवात) दुराचारी आहेत.'' (२:३०)

घाई गडबडीत घटस्फोट घेतला जाऊ नये, म्हणून आणखीन काही अटकाव अशा पद्धतीचे आहेत.

''आणि जर त्याने तिला (तिसऱ्यांदा) तलाक दिला तर जोपर्यंत ती (त्याच्या व्यतिरिक्त) दुसऱ्या पतीशी विवाह करीत नाही, तोपर्यंत त्याच्यासाठी ती निषिद्ध असेल; आणि जर त्याने (देखील) तिला तलाक दिला, तर त्या दोघांनी, जर त्यांना खात्री वाटत असेल, की अल्लाहने (ठरवून दिलेल्या) मर्यादांचे पालन करणे आपणास शक्य होईल, तर पुन्हा (विवाह करून) एकत्र येणे त्यांच्यादृष्टीने पाप ठरणार नाही. आणि या अल्लाहने (ठरवून दिलेल्या) मर्यादा आहेत आणि ज्ञानी लोकांसाठी त्याने त्या स्पष्ट करून सांगितल्या आहेत.'' (२:२३१)

''आणि जेव्हा तुम्ही तुमच्या पत्नींना (रद्द करता येण्याजोगा) तलाक द्याल आणि त्यांच्या नियत कालावधीची अखेर जवळ येईल, तेव्हा त्यांना एकतर उचित रीतीने ठेवून घ्या किंवा उचित रीतीने त्यांना पाठवून द्या. परंतु तुम्हाला त्यांच्यावर दुराचार करता यावा म्हणून त्यांना अन्यायाने ठेवून घेऊ नका. आणि जो कोणी असे करतो, तो खरोखरच आपल्या जीवावरच अन्याय करत असेल असे समजा, आणि अल्लाहच्या आदेशांची थट्टा करू नका, आणि अल्लाहने तुमच्यावर केलेल्या कृपेची आणि त्याने तुमच्याकडे अवतरवलेल्या, आणि ज्याद्वारे तो तुम्हाला उपदेश करतो, त्या ग्रंथाची आणि ज्ञानाची आठवण ठेवा, आणि अल्लाहचे भय बाळगा आणि लक्षात ठेवा अल्लाह सर्व वस्तुमात्रांना चांगल्या प्रकारे जाणतो.'' (२:२३२)

''आणि जेव्हा तुम्ही स्त्रियांना तलाक द्याल आणि त्या त्यांच्या कालावधीच्या पूर्णत्त्वापर्यंत पोहचतील, तेव्हा ते चांगल्या रीतीने आपसात

सहमत असतील तर, त्यांना त्यांच्या पतींशी विवाह करण्यास प्रतिबंध करू नका, तुमच्यापैकी जो अल्लाहवर आणि शेवटच्या दिवसावर श्रद्धा ठेवतो, त्यांच्यासाठी हा सावधानतेचा इशारा आहे. आणि ही गोष्ट तुमच्या दृष्टीने अधिक भाग्यशाली व परमपवित्र आहे, आणि अल्लाहला ते माहीत आहे, परंतु तुम्हाला ते माहीत नाही.'' (२:२३३)

''आणि घटस्फोट (तलाक) मिळालेल्या स्त्रियांनी तीन ऋतुचक्र (मासिकपाळी) होईपर्यंत स्वतःप्रतिक्षा करावी; आणि त्या जर अल्लाहवर आणि शेवटच्या दिवसावर श्रद्धा ठेवत असतील, तर त्यांनी अल्लाहने त्यांच्या गर्भाशयात जे निर्माण केले आहे, ते लपवून ठेवणे त्यांच्यासाठी उचित नाही; आणि जर त्यांच्या पतींची समेट करण्याची इच्छा असेल, तर त्यांना त्या कालावधीत (आपल्या पत्नीच्या स्वरूपात) त्यांना परत घेण्याचा विशेष अधिकार आहे. आणि पुरूषांचे जसे (स्त्रियांच्या बाबतीत) अधिकार आहेत (आणि) तसेच (अधिकार) त्यांना (स्त्रियांना पुरूषांच्या) बाबतीत आहेत, तथापि पुरूषांना त्याबाबतीत त्यांच्यावर (स्त्रियांवर) (थोडेसे) वरचे स्थान आहे. आणि अल्लाह हा सर्वशक्तिमान आणि ज्ञानवान आहे.'' (२:२२९)

जर पती आणि पत्नी परिवर्तनीय घटस्फोटानंतर एकत्र येऊ इच्छित असतील तर घटस्फोटाची घोषणा पूर्णतः निरस्त केली जाऊ शकते.

''आणि तुमच्यापैकी जे मरण पावतात व आपल्या पत्न्या मागे सोडून जातात, तेव्हा त्या पत्नींनी स्वतः चार महिने दहा दिवस प्रतिक्षा करावी. आणि जेव्हा त्यांचा नियत कालावधी पूर्ण होईल, तेव्हा त्या स्वतःच्या बाबतीत चांगल्या रीतीने, जे काही करतील त्यामुळे तुम्हाला कोणतेही पाप लागणार नाही. आणि तुम्ही जे काही करत आहात,

त्याची अल्लाहला जाणीव आहे.'' (२:२३५)

''या विधवा स्त्रियांना विवाहाच्या प्रस्तावासंबंधात सूचक संकेत देण्यामुळे किंवा तशी इच्छा आपल्या मनात बाळगण्यामुळे तुमच्यावर कोणताही दोष येत नाही. तुम्ही यासंबंधात त्यांचा विचार कराल, हे अल्लाहला ठाऊक आहे. परंतु तुम्ही त्यांच्याशी प्रामाणिक शब्दात बोलण्याव्यतिरिक्त गुप्तपणे करारबद्ध होऊ नका. आणि विहित कालावधी पूर्ण होत नाही तोपर्यंत विवाहाचा संकल्प करू नका, आणि याची जाणीव ठेवा की, तुमचा मनात काय आहे, ते अल्लाहला माहीत आहे; म्हणून या गोष्टींपासून सावध रहा. आणि याची जाणीव ठेवा, की अल्लाह हा अतिशय क्षमाशील व संयमी आहे.'' (२:२३६)

''आणि तुमच्यापैकी जे लोक मरण पावतील आणि आपल्या पत्नींना मागे सोडून जातील, त्यांनी आपल्या पत्नींसाठी, त्या घराबाहेर न काढल्या जाता त्यांच्या एक वर्षाच्या निर्वाह सामग्रीची व्यवस्था होईल, अशी अंमिसमयी आपल्या मालमत्तेची मृत्युपत्राने व्यवस्था करावी. परंतु त्या स्वतःहोऊन निघून जातील तर त्यांच्या संबंधात, त्या जी कोणतीही उचित गोष्ट करतील, त्याचा दोष तुमच्यावर असणार नाही. आणि अल्लाह सर्व शक्तिमान व बुद्धिवंत आहे.'' (२:२४१)

''आणि घटस्फोटीत स्त्रियांसाठी देखील योग्य प्रमाणात निर्वाह सामग्रीची करावी. अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांचे हे एक कर्तव्यच आहे.'' (२:२४२)

''जोपर्यंत तुम्ही त्यांना स्पर्श केलेला नाही, किंवा त्यांच्यासाठी वधुदक्षिणा (मेहर) निश्चित केलेली नाही. तोपर्यंत तुम्ही स्त्रियांना तलाक दिल्यास, त्यामुळे तुम्हाला कोणतेही पाप लागणार नाही.

परंतु त्यांना धनवानाने आपल्या ऐपतीनुसार आणि गरीबाने आपल्या ऐपतीनुसार निर्वाह सामग्री द्यावी. साजेशी अशी तरतूद करावी, असे करणे हे सद्वर्तनी लोकांचे कर्तव्य ठरवलेले आहे.'' (२:२३७)

''आणि जर तुम्ही त्यांना स्पर्श करण्यापूर्वी तलाक दिला आणि तुम्ही त्यांच्याबाबतीत वधुदक्षिणा (मेहेर) निश्चित केलेला असेल, तर त्या स्त्रिया स्वतः किंवा जिच्या हाती विवाहाचे बंधन असेल, ती व्यक्ती मेहेर माफ करीत नसेल, तर जो मेहेर तुम्ही निश्चित केलेला असेल त्याचा अर्धा तुमच्याकडून त्यांना देय होईल आणि तुम्ही ते सोडून देणे, हेच सदाचरणाच्या जवळ आहे. आणि एकमेकांचे भले करायला विसरू नका. निःसंशय तुम्ही जे काही करीत आहात ते अल्लाह पहातो आहे.'' (२:२३८)

''आणि मातांनी पूर्ण दोन वर्षापर्यंत आपल्या मुलांना अंगावर दूध पाजावे; हा उपदेश त्यांच्यासाठी आहे, ज्या पूर्ण कालावधीपर्यंत आपल्या मुलांना अंगावर दूध पाजू इच्छितात. आणि मूल ज्याचे आहे त्या बापावर रीती रिवाजानुसार त्यांच्या मातांच्या अन्न आणि वस्त्राची जबाबदारी असेल. कोणत्याही जीवावार त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक जबाबदारी टाकण्यात येत नाही. मातेने तिच्या मुला खातर (बापाला) दुःख देता कामा नये, आणि त्याने आपल्या मुला खातर मातेला दुःख देता कामा नये, आणि वारसा वरही असेच करण्याची जबाबदारी आहे. त्या दोघांनी परस्परांच्या संमतीने आणि विचारविनिमय करून मुलाचे अंगावर दूध पिणे सोडायचे ठरवले, तर त्यांच्यावर कोणताही दोष येत नाही. आणि तुम्हाला तुमच्या मुलांसाठी दूध पाजणारी दाई ठेवायची असेल, तर तुम्ही तिला जे द्यायचे कबूल केले असेल, ते

तुम्ही तिला रास्त रीतीने दिल्यास, त्यामुळे तुमच्यावर कोणताही दोष येत नाही. आणि अल्लाहचे भय बाळगा आणि लक्षात ठेवा तुम्ही जे काही करता, ते अल्लाह पाहात असतो.'' (२:२३४)

या सर्वांचा सार खालील प्रमाणे आहे

''हे पैगंबरा जेव्हा तुम्ही स्त्रियांना घटस्फोट द्याल, तेव्हा विहित मुदतीसाठी त्यांना घटस्फोट द्या, आणि त्या कालावधीची गणना करा; व तुमचा विधाता असलेल्या अल्लाहचे भय बाळगा; स्पष्टपणे वाईट असेल, असे कृत्य त्यांनी केलेले नसेल तर, त्यांना त्यांच्या घरातून काढून टाकू नका आणि त्यांनीही घरातून निघून जाऊ नये. आणि या अल्लाहने ठरवून दिलेल्या मर्यादा आहेत; व जो कोणी अल्लाहच्या मर्यादांचे उल्लंघन करतो, तो खरोखर आपल्या स्वतःच्याच जीवावर अत्याचार करतो. तुला माहीत नाही की, त्यानंतर कदाचित अल्लाह काही तरी नवीन स्थिती निर्माण करील.'' (६५:२)

''त्यानंतर, जेव्हा त्यांनी त्यांची विहित मुदत पूर्ण करण्याची वेळ येऊन ठेपेल, तेव्हा एकतर त्यांना उचित पद्धतीने ठेवून घ्या, किंवा त्यांना उचित पद्धतीने सोडा, आणि साक्षी राहण्यासाठी तुमच्यामधील दोन न्यायी व्यक्तींना बोलावून घ्या; व अल्लाहसाठी खरी साक्ष द्या. हा हितोपदेश त्यास दिला जातो, जो अल्लाहवर आणि अंतिम दिवसावर श्रद्धा ठेवतो आणि जो अल्लाहचे भय बाळगतो - त्याच्यासाठी तो अल्लाह एखादा मार्ग काढील.'' (६५:३)

''आणि तुमच्या स्त्रियांपैकी ज्यांची रजस्वला होण्याची आशा नसेल अशा स्त्रियांच्या विहित मुदतीविषयी जर तुम्हाला शंका असेल तर लक्षात घ्या, की त्यांच्यासाठी विहित मुदत तीन महिने इतकी आहे,

आणि हीच मुदत अशा स्त्रियांसाठी देखील आहे, ज्या अद्याप रजस्वला झालेल्या नाहीत. आणि गर्भवती असलेल्या स्त्रियांच्या बाबतीत, त्यांची मुदत त्या आपले मूल प्रसवतील तोपर्यंत असेल. आणि जो वकोणी अल्लाहचे भय बाळगतो, त्याचे कार्य, तो अल्लाह सुलभ करतील.'' (६५:५)

''विहित मुदतीत त्यांना तुमच्या शक्य त्या ऐपतीनुसार त्याच घरांत ठेवा, ज्यांत तुम्ही राहता; तुम्हाला त्यांचे हाल करता यावेत म्हणून तुम्ही त्यांचा छळ करू नका. आणि त्या गर्भवती असतील तर त्या आपले गर्भ प्रसवेपर्यंत त्यांच्यावर खर्च करा. आणि जर त्या तुमच्यासाठी मुलाला अंगावर पाजीत असतील, तर तुम्ही त्यांना त्यांचा योग्य मोबदला द्या, उचित रीतीने एकमेकाशी विचारविमर्श करा; परंतु जर तुम्हाला एकमेकाशी सहमत होण्यास अडचण आली, तर अन्य स्त्री त्याच्यासाठी (पित्यासाठी)(त्या मुलास)''(६५:७-८)

## बहुपत्नीत्व

बहुपत्नीत्व कुठल्याही धर्मामध्ये ईश्वरीय आज्ञेद्वारे अमान्य करण्यात आले नाही; परंतु इस्लामशिवाय अन्य धर्मांत पत्नींच्या संख्येवर कोणतीही मर्यादा लावण्यात आली नाही. इस्लाम बहुपत्नीत्वाची परवानगी देतो; परंतु ही संख्या चार पर्यंत मर्यादित ठेवतो तसेच ही परवानगी सर्वपत्नींबरोबर समन्याय्य व्यवहाराच्या अटीच्या अधीन आहे.

''आणि आपण न्याय देऊ शकणार नाही असे जर तुम्हाला भय वाटत असेल तर, एकच स्त्रीशी विवाह करा.'' (४:४)

एकापेक्षा अधिक पत्नींच्या बाबतीत समन्याय्य वागणूक म्हणजे

त्यांच्यामध्ये उदरनिर्वाह, संगोपन आणि प्रेम संबंधाच्या बाबतीत समान वागणूक अपेक्षित आहे. अर्थात सर्वांना समान संधी मिळणे आवश्यक आहे. अशी समानता अशा गोष्टींच्या बाबतीत लादलेली नाही, ज्या मानवाच्या नियंत्रणाबाहेर आहे. उदारहणार्थ, भावनिक गटबंधन आणि भावनिक झुकावाचे प्रमाण, ज्यांना सामान्य नियमानुसार वगळण्यात आले आहे.

''हे अल्लाह, जो पेलण्याची आमच्यात शक्ती, नाही तो भार आमच्यावर टाकू नकोस;'' (२:२८७)

परंतु त्याबाबतीत एक स्पष्टीकरण आहे,

''आणि तुमची कितीही इच्छा असली तरी तुम्ही तुमच्या पत्नींमध्ये (न्यायपूर्ण व्यवहाराचा) समतोल ठेवू शकत नाही, परंतु संपूर्णपणे (एकीकडे) असे झुकू नका की, ज्यामुळे तुम्ही दुसरीला अधांतरी सोडून द्याल, आणि जर तुम्ही समझोता केला आणि सदाचरणाने वागलात, तर अल्लाह हा निश्चितच सर्वाधिक क्षमाशील व दयाळू आहे.'' (४:१३०)

काहीं आधुनिक मुस्लिम लेखक, पाश्चात्यांचे समाधान करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन असा विमर्श करतात की, बहुपत्नीत्व सर्व पत्नींना समन्याय्य वागणूकीच्या अटीवर (४-४) आणि समन्याय्य वागणूक देणे, अशक्य ठरवण्यात असल्यामुळे (४-१३०) ही परवानगी निरस्त करण्यात आली होती. ही विचारधारा पूर्णपणे चूकीची आणि असमर्थनीय आहे. आयत क्रमांक ४:१३० मध्ये अतिशय सुस्पष्टपणे बहुपत्नीत्वास जारी ठेवण्यात आल्याचे निदर्शित करते. त्याचप्रमाणे ४:३० आयतीच्या संदर्भात पवित्र पैगंबरांनी किंवा त्यांच्या सोबतींनी, असा अन्वयार्थ

लावलेला नाही की, बहुपत्नीत्वाची परवानगी रद्द करण्यात आली आहे, जी परवानगी आयती मध्ये देण्यात आली होती. त्याचप्रमाणे अशा प्रकारचा अन्वयार्थ कोणत्याही मुस्लिम कायदे पंडितांनी एवढया शकतात लावलेला नाही.

वस्तूस्थिती अशी आहे की, इस्लामने बहुपत्नीत्वाची व्याख्या आणि मर्यादा अतिशय विवेकपूर्ण पद्धतीने निर्धारित केली आहे, ज्यामुळे उच्चकोटीच्या नैतिक आदर्श आणि पुरूष आणि स्त्रीच्या लैंगिक विशुद्धतेला पूर्ण सुरक्षित केले गेले आहे. त्याला असेही म्हणता येईल की, हे कल्याणकारी नैतिक आणि संस्कृतिक सुरक्षाबंध आहे. अशा प्रकारच्या सुरक्षाबंधाच्या अभावामुळे, ज्या समाजांमध्ये सक्तीने एक पत्नीत्वाचा नियम अंमलात आणला गेला जातो, ते समाज लैंगिक अनाचार, पुरूष आणि स्त्रीयांची समलैंगिकता आणि पाश्वी लैंगिकता, याद्वारे पूर्ण उध्वस्त झाले आहेत. अमर्यादित लैंगिक संबंध अशा समाजामध्ये साधारण बाब आहे, आणि त्याला नैतिक अमान्यताही दिली जात नाही.

नैतिकतेची मर्यादा एक पत्नीत्व आणि बहुपत्नीत्व यात स्थापित न करता नियंत्रण आणि अनुज्ञा यामध्ये स्थापित केली जावी. कुठल्याही नैतिक बंधनाशिवाय एक पत्नीत्व आणि बहुपत्नीत्व दोन्हींच्या गैरवापर होऊ शकतो. परस्पर संबंधांमधील चारित्र्य, याला प्रतिष्ठा किंवा अप्रतिष्ठा देत असते. पूर्वी नमूदकेल्या प्रमाणे इस्लाम मध्ये विवाहाचा अंतिम आणि चरम उद्देश परमेश्वराची मर्जी संपादन करणे, हा आहे. म्हणून इस्लाम मानवाच्या सर्व क्षमता आणि सामर्थ्याचे कल्याणकारी उन्नयन करताना, अतिशय विवेकपूर्ण नियमांचे बंधन घालतो आणि त्या

क्षमतांचे कठोरपणे दमन करण्यास धिक्कारतो.

इस्लामच्या सुरूवातीच्या काळामध्ये या दैवी आदेशाला प्रतिसाद देताना विशेषतः पुरूषांनी आपले जीवन समर्पित केले. अनेकांनी हे समर्पण मक्का येथे, बहुतेक मदिना येथे आणि अन्य लोकांनी रणभूमीवर समर्पित केले. जरी स्त्रियापूर्णपणे वगळण्यात आल्या नव्हत्या; तरी पण तुलनेने अतिशय अल्प प्रमाणात स्त्रीयांना अशा चरम त्यागाचा अवलंब करावा लागला. परिणामस्वरूप मुस्लिम समाजामध्ये स्त्रीयांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत झपाट्याने वाढले. विधवा आणि अनाथ, पुरूष आणि स्त्रीयांची व्यवस्था करणे आवश्यक होते. अशा परिस्थितीमध्ये नैतिक आणि आध्यात्मिक आदर्शांची सुरक्षा करण्यासाठी बहुपत्नीत्व अनिवार्य ठरले. ते एक प्रकारचे बलीदान होते आणि निश्चितच ते उपभोगवादी नव्हते.

बहुपत्नीत्वासाठी वयैक्तिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक गोष्टींचे देखील परिशीलन केले जाते. आधुनिक काळामध्ये परिस्थिती बदलली असून अफ्रीका खंडाच्या बाहेर एक पत्नीत्व हा जवळ जवळ नियम रूढ झाला आहे. परंतु प्रत्येक ठिकाणी वैयक्तिक बाबतीत नैतिक बाबींना ध्यानात घेऊन बहुपत्नीत्वाची गरज शिल्लक राहतेच. इस्लाम अशा बाबतीत व्यवस्था करतो.

मुस्लिम समाजामध्ये बहुपत्नीत्वाला कुठलेही लांछन लागलेले नाही, ते एक पत्नी एवढेच आदरणीय आहे आणि त्यामुळे पत्नी आणि त्यांच्या मुलांमध्ये कुठलाही पक्षपात होताना दिसून येत नाही.

## माता

इस्लाम मध्ये मातेला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले

आहे. अपत्यांच्या प्रति पालकांच्या विशेषतः आईच्या प्रेम, वात्सल्य आणि समर्पणवृत्तीबद्दल पवित्र कुरआन मध्ये वारंवार भर देण्यात आला आहे.

''आणि आम्ही माणसाला त्याच्या मातापित्यांशी प्रेमाने वागण्याची आज्ञा केलेली आहे.'' (२९:९)

''तू त्यांना असे सांग की, या तुमच्या विधात्याने ज्यागोष्टी निषिद्ध ठरवल्या आहेत, त्या मी तुम्हाला वाचून दाखवतो; कोणत्याही वस्तुमात्राला त्याचे सहभागी ठरवू नका आणि तुमच्या मातापित्यांशी भलेपणाने वागा.'' (६:१५२)

''आणि अल्लहाची उपासना करा आणि इतर कोणलाही त्याचा भागीदार ठरवू नका, आणि आपल्या आईवडीलांशी चांगूलपणाने वागा.'' (४:३७)

''तुझ्या विधात्याने अशी आज्ञा केलेली आहे की, अन्य कोणाची नव्हे तर केवळ त्याचीच उपसना कर, माता-पित्यांशी सौजन्याने वाग, त्यांच्यापैकी एकास किंवा त्या दोघांनाही तुझ्यासमक्ष म्हातारपण आले, तर त्यांना उद्देशून तिटकारा व्यक्त करणारा एखादा शब्दही उच्चारू नकोस व त्यांना टाकून बोलू नकोस, तर त्यांच्याशी नम्रतेने संभाषण कर. आणि त्यांच्यापुढे करूणापूर्वक नम्रतेने वाग. आणि म्हण की, हे माझ्या विधात्या, त्या दोघांवर कृपा कर, जशी त्यांनी मी लहान असताना माझे पालनपोषण करताना (मजवर केली आहे).'' (१७:२४-२५)

''आणि आम्ही मनुष्यास त्याच्या मातांपित्यांविषयी आदेश दिला आहे – त्याची आई अधिकाधिक अशक्त होत असताना त्यास पोटात

सांभाळते, आणि त्याचे अंगावर दूध पिणे सुटायला दोन वर्षे लागतात. (तेव्हा) मला आणि तुझ्या मातापित्यांना धन्यवाद दे. (शेवटी तुला) माझ्याकडेच परतावयाचे आहे.'' (३१:१५)

''आणि आम्ही मनुष्याला आपल्या मातापित्यांशी सौजन्याने वागण्याचा आदेश दिलेला आहे. त्याची माता त्याला कष्टाने आपल्या पोटात वाहते आणि मोठया कष्टाने त्यास जन्म देते. आणि त्याचे गर्भात राहणे व दूध तुटणे यास तीस महिने लागतात, पुढे जेव्हा तो पूर्ण वयात येतो आणि चाळीस वर्षे (वयाला) पोहोचतो, तेव्हा म्हणू लागतो, हे माझ्या विधात्या, मला (असे सामर्थ्य) दे की, तू माझ्यावर आणि माझ्या मातापित्यांवर जो अनुग्रह केलेला आहेत, त्याबद्दल मी कृतज्ञ राहावे, आणि मी अशी सत्कृत्ये करावीत की, ज्यामुळे तू प्रसन्न व्हावेस. आणि माझ्यासाठी माझ्या संततीलाही सदाचरणी कर. मी तुझ्याकडेच वळलो आहे आणि मी सर्वस्वी तुला शरण जाणाऱ्यांपैकी आहे.'' (४६:१६)

पवित्र पैगंबर म्हणतात कीः

''तुमच्यापैकी सर्वोत्तम तो आहे, जो आपल्या कुटुंबीयांशी सर्वोत्तम व्यवहार करतो.''[४]

''मातेच्या चरणाखाली स्वर्ग आहे.''[५]

''जो आपल्या मुलींचे योग्य संगोपन करतो आणि मुलगा आणि मुलगी मध्ये भेदभाव करत नाही, तो स्वर्गामध्ये माझ्या समीप राहील.''[६]

## स्त्रीची आर्थिक स्थिती

जगातील सर्व प्रमुख धर्मांच्या तुलनेत स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य

देण्याच्या बाबतीत, इस्लाम अद्वितीय आहे. हे सर्व ज्ञात आहे की, युनाटेड किंग्डम मध्ये १८८२ पर्यंत, जेव्हा पहिल्यांदाच 'मॅरिड विमन्स प्रोपटी ॲक्ट' संसदेत पारित झाला, तोपर्यंत विवाहित महिलेला स्वतंत्रपणे स्वतःची मालमत्ता बाळगण्याचा अधिकार नव्हता. एखाद्या अविवाहित स्त्रीची जी काही मालमत्ता असेल, ती लग्नानंतर आपोआप नवऱ्याची मालमत्ता होत असे. १०० वर्षे झाल्यानंतर देखील ब्रिटीश कायद्यामध्ये आजदेखील काहीं अशी कलमे आढळून येतात, ज्यानुसार विवाहित स्त्री तिच्या पतीवर विसंबून असणे अपेक्षित आहे.

इस्लाममध्ये अगदी सुरूवातीच्या काळापासूनच स्त्रीला पूर्णपणे आर्थिक स्वातंत्र बहाल करण्यात आले आहे. विवाहप्रसंगीच पतीला आपल्या पत्नीच्या प्रति असलेल्या जबाबदारींचा उल्लेख करावा लागतो. त्याला वधुदक्षिणा (मेहेर) निश्चित करावा लागतो. पतीच्या मृत्यु समयी, जर पतीवर ही वधुदक्षिणा (मेहेर) देणे बाकी असेल, तर तो पतीवर असलेला कर्ज मानले जाईल आणि त्याच्या मालमत्तेतून सर्वप्रथम इतर कर्जांबरोबर हे कर्ज देखील फेडणे अनिवार्य राहील. याशिवाय पतीच्या मालमत्तेमध्ये तिचा जो कायदेशीर वाटा आहे, तो सुद्धा तिला मिळणे क्रमप्राप्त आहे.

जर स्त्री स्वतःच्या प्रयत्नाने काहीं संपत्ती प्राप्त करत असेल किंवा बक्षीस स्वरूपात काहीं मालमत्ता मिळाली असेल तर ती स्वतंत्रपणे तिची एकटीची मालमत्ता असेल; ज्यावर तिच्या पतीचा काहींही संबंध नसेल. ती आपल्या पतीला या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार देऊ शकते, परंतु ती जर स्वतः या मालमत्तेचे व्यवस्थापन करू इच्छित असेल, तर तिचा पती त्यामध्ये कोणताही हस्तक्षेप करू शकत नाही.

जर एक विवाहित स्त्री, तिच्या स्वतंत्र कमाईचा काहीं भाग किंवा संपूर्ण कमाई, कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर खर्च करत असेल, आणि सर्वसाधाराणपणे ती खर्च करत असेल, तर तसे करणे तिच्यावर बंधनकारक नाही. कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवणे संपूर्णपणे पतीची जबाबदारी आहे, जरी पत्नीची सांपत्तीक स्थिती पतीपेक्षा चांगली असली तरी.

ही गोष्ट खालील उदाहरणावरून सुस्पष्ट होते, एकदा पवित्र पैगंबर (स.) यांनी स्त्रीयांना त्यांच्या स्वतंत्र कमाईतून धर्म कार्यासाठी खर्च करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर दोन स्त्रीया, ज्या दोघींचे नाव ज़ैनब होते, त्यांच्यापैकी प्रेषितांचे एक सुप्रसिद्ध सोबती 'अब्दुल्लाह बिन मसूद' यांची पत्नी होती. त्या पैगंबराकडे आल्या आणि म्हणाल्या की, ''त्यांचे पती आर्थिक दृष्टया कमकुव्वत आहेत, परंतु त्या त्यांच्या स्वतंत्र अधिकारात त्यांच्या पतींपेक्षा जास्त संपन्न आहेत. जर त्या त्यांच्या पतींना त्यांच्या संपत्तीतून मदत करत असतील, तर त्यांचे ते कृत्य आध्यात्मिक दृष्टया पुण्यकर्म ठरेल काय? पवित्र पैगंबर (स) यांनी त्यांना खात्री दिली, की तुमचे आपल्या पतिंना सहाय्य करणे पुण्यकर्म ठरेल, कारण ते एकाप्रकारे धर्म कार्य असेल आणि दुसऱ्या प्रकारे ते तुमच्या मुला-बाळांप्रती तुमचा दयाभाव असेल.''

पवित्र कुरआन स्पष्ट करतो की,

''ज्या गोष्टीद्वारे अल्लाहने तुमच्यापैकी काही लोकांना इतरांपेक्षा श्रेष्ठत्व दिलेले आहे, त्या गोष्टींचा लोभ धरू नका. पुरूषांनी जे काही कमावले आहे, त्यातील हिस्सा त्यांना मिळेल, आणि स्त्रियांनी जे काही कमावले आहे, त्यातील हिस्सा त्यांना मिळेल. आणि अल्लहाच्या

कृपेची याचना करा. खरोखर, अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे तंतोतंत ज्ञान असते.'' (४:३३)

''आम्ही प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत त्याने जे मागे ठेवले आहे, त्या संपत्तीचे वारस नियुक्त केलेले आहेत, ते तुमचे आई-वडील आणि नातेवाईक व तसेच तुम्ही शपथपूर्वक ज्यांच्याशी प्रतिज्ञा केलेली आहे, ते लोक होत. म्हणून त्यांना त्यांचा हिस्सा द्या. अल्लाह निश्चितच सर्व गोष्टींवर लक्ष ठेवून आहे.'' (४:३४)

इस्लामी व्यवस्थेमध्ये वारसाहक्क आणि पैतृक अधिकार, ज्याचा उल्लेख (४:१२-१३) आणि (४:१७७), त्याचा उद्देश मालमत्तेचे विस्तृत वाटप करणे आहे. जर एखादी व्यक्ति अशा अवस्थेत मरण पावत असेल, जेव्हा त्याचे आई-बाप, पत्नी किंवा पती, मुलगे आणि मुली, सर्व हयात असतील तर प्रत्येक काळात त्याच्या मालमत्तेत, ज्याचा त्याचा योग्य वाटा मिळतो. सर्व सामान्य नियमाप्रमाणे पुरूषाला स्त्रीच्या दुप्पट वाटा त्यांच्या त्यांच्या नाते संबंधानुसार मिळतो. यामध्ये स्त्री वारसांच्या प्रति कुठल्याही प्रकारचा पक्षपात नाही. कारण पुरूषांवर असलेल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे ते आवश्यक आहे. अशा कुठल्याही जबाबदाऱ्या स्त्रीवर बंधनकारक नाहीत. व्यवहारात हे स्त्री वारसांच्या हिताचेच ठरते.

एक मुसलमान आपल्या मालमत्तेपैकी एकतृतीयांश भागापेक्षा जास्त मालमत्तेचा विनियोग करारपत्रा (मृत्युपत्र) अधारे करू शकत नाही. धर्मादाय कार्यासाठी किंवा वारस नसलेल्या नातेवाईकांसाठी, करापत्रा आधारे संपत्तीचा वाटा देताना त्याला संपत्तीचा एकतृतीयांश भागाची मर्यादा ओलांडता येत नाही. तसेच कोणत्याही वारसदाराचा

वाटा त्याच्या ठरलेल्या भागापेक्षा, करारपत्रा आधारे कमी किंवा जास्त करता येत नाही. इस्लाम मध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये दोन वारसदारांमध्ये भेदभाव करता येत नाही. ज्याचा त्याचा ठरलेला वाटा त्याला मिळणे अनिवार्य आहे. उराहरणार्थ, प्रथम वारसदार म्हणून एखाद्याला अधिक वाटा किंवा स्त्री म्हणून एखाद्या वारसाला तिच्या हक्कापासून वंचित ठेवता येत नाही.

मालमत्तेच्या विनियोगा संदर्भात केलेल्या करारपत्रावर साक्षीदार नियुक्त करण्याच्या बाबतीत, जे निर्देश आले आहेत, त्याचा गैर अर्थ घेऊन स्त्रीच्या बाबतीत पक्षपात केला जातो, असे म्हटले जाते. तो निर्देश खालील प्रमाणे आहे.

''आणि तुमच्या पुरूषांमधून दोन साक्षीदार बोलावून घ्या, आणि जर दोन पुरूष (उपलब्ध होत) नसतील, तर तुम्हाला साक्षीदार म्हणून पसंत असतील त्या लोकांमधून एक पुरूष व दोन स्त्रिया यांना साक्षीदार म्हणून ठेवा, हे अशा कारणासाठी आहे की, जर दोन (स्त्रियांपैकी) एखादीच्या स्मृतीने दगा दिला, तर एकीने दुसरीला आठवण करून द्यावी.'' (२ः२८३)

या ठिकाणी अल्पसा देखील भेदभाव नाही. सर्वसाधारण नियम असा आहे की, स्त्रीयांना न्याय्यिक प्रक्रियेमध्ये साक्षीदार म्हणून हजर होण्यापासून सुरक्षित ठेवले जावे. त्यामुळे सर्वसाधारणपणे स्त्रीयांना आर्थिक व्यवहाराच्या दस्तऐवजावर साक्षीदार म्हणून सही करण्यापासून टाळले जाते, परंतु आपात्कालीन परिस्थितीमध्ये, हा नियम शिथिल केला जाऊ शकतो. पुरूष साक्षीदारांच्या बाबतीत आर्थिक व्यवहाराच्या संदर्भात त्यांनी ज्या दस्तऐवजावर सही केली आहे, त्या संदर्भात

आपसात वारंवार चर्चा घडत असल्यामुळे त्यांच्या स्मरणशक्तीचे पुनरुज्जीवन होत असते, परंतु जर एखाद्या दस्तऐवजावर एक पुरूष आणि एक स्त्री साक्षीदार म्हणून सही करत असतील तर इस्लामच्या सामाजिक व्यवस्थेनुसार, त्या स्त्री आणि पुरूष साक्षीदारांची वारंवार भेट होऊ शकत नाही आणि त्या दस्तऐवजाच्या संदर्भात चर्चा होऊ शकत नाही आणि तिची स्मरणशक्ती ताजी होऊ शकत नाही. म्हणून स्मरणशक्तिचे पुनरुज्जीवन होण्याची संधी स्त्रीच्या बाबतीत कमी असल्यामुळे त्यावर विवेकपूर्ण उपाय म्हणून, एक पुरूषाबरोबर दोन स्त्रीयांना साक्षीदार नेमण्याची व्यवस्था केली आहे, जेणेकरून त्या दोघी एकमेकाशी चर्चा करून आपली स्मरणशक्ती ताजीतवानी करू शकाव्या. ही व्यवस्था फक्त साक्षी पुराव्याच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आली असून, त्यामध्ये स्त्री साक्षीदार आणि पुरूष साक्षीदार यांना कमी किंवा जास्त लेखण्याचा संबंध नाही. एक उदाहरण देऊन ही गोष्ट स्पष्ट केली जाऊ शकते, समजा जर एक आर्थिक व्यवहाराच्या दस्तऐवजावर एक पुरूष आणि दोन स्त्रीयांची साक्ष नोंदण्यात आली आहे आणि त्या संदर्भात वाद निर्माण होऊन, तो न्याय व्यवस्थेपुढे निर्णयासाठी आला आहे, आणि समजा या दरम्यान दोन स्त्री साक्षीदारांपैकी एकीचा मृत्यु झाला आहे, एक पुरूष साक्षीदार आणि जीवंत असलेली दुसरी स्त्री साक्षीदार यांची कोर्टासमोर तपासणी केल्यानंतर असे आढळून आले की, दोघांच्या जबानीत खूप तफावत आहे; परंतु न्यायाधीशाला जर असे वाटले की, परिस्थितीजन्य पुराव्यांना लक्षात घेता स्त्री साक्षीदाराचा उत्तर जास्त विश्वसनीय आहे, तर अशा परिस्थितीमध्ये न्यायधीशाचे हे कर्तव्य आहे की, त्याने पुरूष साक्षीदाराची साक्ष फेटाळून स्त्री

साक्षीदारीच्या साक्षीनुसार न्याय द्यावा. म्हणून या बाबतीत स्त्रीच्या बाजूने किंवा विरोधात कोणताही पक्षपात करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

## पुरूष आणि स्त्रीची सुरक्षितता

स्त्री आणि पुरूष हे एकमेकासाठी दैवी उपहार आहेत. आणि म्हणून त्यांचे संबंध परेश्वराची इच्छापूर्ति आणि मर्जी संपादन करण्याचे साधन ठरावे. ज्यांनी त्यांची निर्मिती केली आहे, तोच त्यांच्यातील कमतरता आणि सबळता याबद्दल व्यवस्थित जाणून आहे. म्हणून त्यानेच त्याच्या कृपेने त्यांच्या कमतरता पासून त्यांना सुरक्षित ठेवण्याच्या बाबतीत आणि त्यांच्या बलस्थानांच्या वृद्धीसाठी मार्गदर्शन केले आहे. या मार्गदर्शनांच्या बाबतीत दुलर्क्ष करणे किंवा पळवाटा शोधणे, त्यांच्यासाठी हानीकारक ठरू शकते आणि या मार्गदर्शनाचे काळजीपूर्वक आणि निश्चित पालन करणे, त्यांच्या जीवनाच्या आनंदासाठी आणि पावित्र्यासाठी लाभदायक होऊ शकते.

पवित्र कुरआन या बाबतीत निर्देश करतो की,

''आणि निश्चितच, आम्ही मानवास निर्माण केलेले आहे आणि त्याचे मन त्याला हळूच काय सांगत असते, ते आम्हाला ठाऊक आहे.'' (५०:१७)

''आम्ही मनुष्यास एका मिसळलेल्या वीर्याच्या बिंदूपासून निर्माण केले (ते यासाठी) की तोपर्यंत आम्हाला त्याची कसोटी पाहता यावी; जेव्हा आम्ही त्यास ऐकणारा व पाहणारा बनवू. आम्ही त्यास सन्मार्ग दाखवला आहे, मग त्याने कृतज्ञता दाखववावी किंवा कृतघ्न व्हावे.''

(७६:३-४)

माणसाचे मन, श्रवण, शक्ति, दृष्टि आणि अन्य ज्ञानेंद्रियांच्या आधारे, जे ज्ञान ग्रहण करते, त्याच्यातूनच तो भल्या आणि वाईट प्रेरणा घेतो, म्हणून त्याला सावध करण्यात आले आहे की,

''आणि ज्या गोष्टीचे तुला ज्ञान नाही, ती अनुसरू नकोस. निःसंशय, कान, डोळे आणि मन या सर्वांना जाब विचारण्यात येईल.'' (१७:३७)

म्हणून सर्व इंद्रियांचे नियमन आणि त्यांच्यावर सतत देखरेख ठेवणे हेच सन्मार्गांचे सारांश आहे. पवित्र पैगंबरांना आदेशित केले आहे की,

''श्रद्धावंत पुरूषांना सांग की, त्यांनी आपली नजर खाली ठेवावी आणि आपल्या गुप्तांगाचे रक्षण करावे. ही त्यांच्यासाठी फार शुद्ध (वर्तणूक) आहे. निःसंशय, ते जे काही करतात त्या सर्वांची अल्लाहला चांगली जाणीव आहे. आणि श्रद्धावंत स्त्रियांना सांग, की त्यांनी आपली नजर खाली ठेवावी आणि आपल्या शरीराची गुह्यांगे सुरक्षित ठेवावीत. आणि (शरीरवरचे) बाहेरचे दागिने सोडून आपल्या इतर साज-शृंगारांचे प्रदर्शन करू नये. आणि आपला पदर आपल्या वक्षः स्थलावरील भागापर्यंत ओढून घ्यावा, आणि त्यांचे पती, त्यांचे पिता, किंवा त्यांच्या पतीचा पिता अथवा त्यांचे पुत्र किंवा त्यांच्या पतीचे पुत्र किंवा त्यांच्या बहिणींचे पुत्र, किंवा त्यांच्या भावांचे पुत्र किंवा त्यांच्या बहिणींचे पुत्र, किंवा त्यांच्या स्त्रिया, किंवा त्यांच्या उजव्या हाताच्या अधीन असलेले दास, किंवा लैंगिक संबंधाची भूक नसलेले पुरूष-नोकरचाकर, किंवा स्त्रियांच्या गुप्तांगांसंबंधात ज्ञान नसणारी लहान

मुले, यांच्या व्यतिरिक्त इतरांसमोर आपल्या शृंगाराचे प्रदर्शन करू नये. आणि त्यांनी आपले पाय जमिनीवर अशाप्रकारे आपटू नयेत की त्यांनी झाकून ठेवलेले त्यांचे दागिने (लोकांना) माहीत व्हावेत. आणि हे श्रद्धावंतांनो, तुम्ही सर्वजण अल्लाहला शरण जा (ते) यासाठी की तुम्ही सफल व्हावे.'' (२४:३१-३२)

''हे श्रद्धावंत लोकहो! जे तुमच्या उजव्या हाताच्या अधीन असलेले दास आहेत, त्यांनी आणि तुमच्यामधील यौवनावस्था प्राप्त न झालेली मुले आहेत, त्यांनी सकाळच्या प्रार्थनेपूर्वी आणि उन्हाळयात दुपारी तुम्ही जेव्हा आपले कपडे काढून ठेवता, तेव्हा आणि रात्रीच्या प्रार्थनेनंतर (तुमच्यासमोर येण्यापूर्वी) या तीन वेळी तमची अनुज्ञा घ्यावी. (या) तीन वेळा तुमच्यासाठी एकांतवासाच्या आहेत. या तीन वेळा सोडल्यानंतर इतर वेळी ना तुमच्यावर कोणताही दोष असेल ना त्यांच्यावर, (कारण) त्यांना तुमच्या (भेटीसाठी) यावे जावे लागत असते आणि तुमच्यापैकी काही लोक परस्परांकडे (जात-येत) असतात. अशाप्रकारे अल्लाह तुम्हाला संकेत स्पष्ट करून सांगतो. कारण अल्लाह सर्वज्ञ व बुद्धिवंत आहेत.'' (२४:५९)

''आणि जेव्हा तुमच्यातील मुले, वयात येतील त्यांनी देखील त्याच प्रकारे अनुज्ञा घ्यावी ज्याप्रकारे त्यांच्याआधी (ज्यांचा उल्लेख आला आहे ते) लोक अनुज्ञा घेतात. अशाप्रकारे अल्लाह तुम्हाला त्याचे आदेश स्पष्ट करून सांगतो आणि तो सर्वज्ञ व बद्धिवंत आहे.'' (२४:६०)

''आणि ज्यांना विवाह करण्याची इच्छा नाही, अशा वृद्ध स्त्रियांनी आपल्या शृंगाराचे प्रदर्शन न करता आपली (बाह्य) वस्त्रे

उतरवून ठेवली तर त्यांच्यावर कोणताही दोष असणार नाही. परंतु त्यांनी (त्यापासून) अलिप्त राहणेच त्यांच्यादृष्टीने हिताचे आहे. आणि अल्लाह सर्व काही ऐकणारा व सर्वज्ञ आहे.'' (२४:६१)

पवित्र पैगंबरांच्या पत्नीसाठी काहीं विशेष निर्देश देण्यात आले होते, जे सद्‌वर्तनाचे आदर्श ठरू शकतात म्हणून सर्व श्रद्धावंत स्त्रीयांनी सुद्धा त्याचे अनुकरण करणे श्रेयस्कर आहे.

''हे पैगंबरा, तुझ्या पत्नींना सांग की, जर तुम्ही इहलोकातील जीवन आणि त्यातील चमकदमक यांची इच्छा बाळगीत असाल तर या, मी तुम्हाला तो प्रदान करून तुम्हाला चांगल्याप्रकारे मुक्त करतो. परंतु जर तुम्ही अल्लाहची व त्याच्या प्रेषिताची आणि पारलौकिक जीवनातील निवासाची इच्छा बाळगीत असाल, तर तुमच्यापैकी जे भलाई करीत आहेत, त्यांच्यासाठी अल्लाहने खरोखरच फार मोठे पुण्यफळ नियत करून ठेवलेले आहे. हे पैगंबराच्या पत्नीनों! जर तुमच्यापैकी कोणी उघडउघड अयोग्य कृत्य करील तर तिची शिक्षा दुप्पट करण्यात येईल. आणि ती गोष्ट अल्लाहसाठी सहज शक्य आहे. परंतु तुमच्यापैकी जी कोणी अल्लाहच्या व त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करील व सत्कर्मे करील तिला आम्ही दुप्पट पुण्यफल प्रदान करू; आणि आम्ही तिच्यासाठी प्रतिष्ठेची आजीविका तयार ठेवली आहे.'' (३३:२९-३२)

''हे प्रेषिताच्या पत्नींनो! तुम्ही जर सदाचरणी असाल, तर तुम्ही इतर स्त्रियांपेक्षा वेगळ्या आहात. म्हणून अति सौम्य आवाजात बोलू नका, नाहीतर ज्यांच्या मनात विकृति आहे, तो (उगीचच) मोहित होईल; आणि नेहमी सभ्य भाषेत बोला. आणि आपल्या घरातच

मर्यादित रहा, व अज्ञान काळाच्या रीतीप्रमाणे साजशृंगार करू नका, आणि नित्य प्रार्थना करा व दान (ज़कात) द्या, आणि अल्लाहची व त्याच्या प्रेषिताची आज्ञा पाळा. जे काही अमंगल आहे, ते सर्व अल्लाह तुमच्यापासून दूर काढून टाकू इच्छितो व तुम्हाला पवित्र करू इच्छितो. हे कुटुंबियांनो, तो तुम्हाला पूर्णपणे पवित्र करू इच्छितो. आणि तुमच्या घरांमध्ये अल्लाहची जी वचने व ज्ञान ऐकवले जाते, त्याचे स्मरण करत रहा. खरोखर अल्लाह अति सूक्ष्मांचे ज्ञान बाळगणारा व सर्व काही जाणणारा आहे.'' (३३:३३-३५)

वर दिलेले निर्देश अशासाठी गठीत केले आहेत की, जेणे करून पुरूष आणि स्त्रीयांनी सदाचरणाचे अत्योच्च मानबिंदू स्थापित करावेत. आणि त्यांनी एकमेकाशी व्यवहार करताना स्वतःची प्रतिष्ठा आणि स्वाभिमान याची हर प्रकारे जपवणूक करावी. शालीनता, नैतिकता आणि शुद्धता हे इस्लामिक समाजव्यवस्थेचे मानबिंदू आहेत. म्हणून मुक्त आणि बंधनविरहित भिन्न लिंगी व्यक्तिंचे आपसात मिसळणे निषिद्ध केले आहे. स्त्री आणि पुरूष दोघांनाही स्वतःची प्रतिष्ठा निश्चित प्रमाणात कायम राखणे आवश्यक आहे. स्त्रीयांच्या बाबतीत त्यांची विनयभंग होणार नाही, यासाठी काहीं सुरक्षा व्यवस्था करणे आवश्यक आहे.

''हे पैगंबरा! तुझ्या पत्नी, तुझ्या मुली आणि श्रद्धावंत स्त्रिया यांना असे सांग की, आपल्या बाह्य वस्त्राचा (मोकळा) भाग आपल्या भोवती ओढावा. त्यामुळे हे शक्य होते, की त्या ओळखल्या जाऊ शकतील आणि त्यांना त्रास दिला जाणार नाही. आणि अल्लाह अतिशय क्षमाशील व दयाळू आहे.'' (३३:६०)

स्त्री आणि पुरूषांचे अनिर्बंध आणि अनियमित एकत्रित येणे आणि स्त्रीयांचे पुरूषांना आकर्षित करण्यासाठी स्वतःला सादर करणे, हे पाश्चिमात्य समाजाचे वैशिष्टये झाले आहे. म्हणून सर्व प्रकारची शालीनता अणि सभ्यता यांना पूर्णपणे तिलांजली देऊन पूर्वाश्रमीची जी आदर्शे होती, त्यांना अपराध मानून धिक्कारण्यात येत आहे. ही गोष्ट अतिशय काळजी करण्यासारखी आहे, की काहीं पाश्चात्य विचाराने प्रभावित मुसलमान सुद्धा स्वतःला या आत्मघाती प्रथांपासून, ज्या पाश्मित्य देशात पसरलेल्या आहेत, स्वतःला रोखू शकत नाहीत. आपण आशा करूया, की या विचारधारेतील आणि अशा प्रकारच्या वर्तणातील धोका लवकरच लक्षात येईल आणि इस्लामी आदर्शांच्या हितकारकर्ते बद्दल खात्री निर्माण होऊन, त्या आदर्शांना ढदृतेने धारण केले जाईल.

## पवित्र प्रेषितांची काहीं वचने

हकीम इब्ने मुआविया म्हणतातः 'मी पवित्र प्रेषिताना विचारले, पत्नीचे पतीवर काय काय अधिकार आहेत.' ते म्हणाले, ''जे तुम्ही खातात, ते तिला खाऊ घाला, तुम्ही जसे कपडे वापरतात तसे तिला वापरायला द्या, तिच्या चेहऱ्यावर कधीही मारू नका, घराबाहेर असताना, तिच्यावर ओरडू नका आणि तिला स्वतःपासून विभक्त करू नका.''[७]

अबु हुरैरा म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणालेः ''श्रद्धावंतांमध्ये सर्वोत्तम तो आहे ज्याचे आचरण चांगले आहे, आणि तुमच्यापैकी सर्वोत्तम ते आहे ज्यांचे आचरण त्यांच्या पत्नीबरोबर उत्तम आहे.''[८]

अब्दुल्लाह इब्ने अमर म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणाले, ''हे

जग एक खजिना आहे, आणि जगातील खजिन्यातील सर्वात मौल्यवान वस्तू स्त्री आहे.''[९]

हजरत आयशा म्हणतात, ''माझ्याकडे एक महिला, तिच्या दोन मुलीसह येऊन भीक मागू लागली. माझ्याकडे त्यावेळी एक खजूर शिवाय अन्य काहीच नव्हते, जे मी तिला देऊन टाकले; तिने त्या खजूराचे दोन टुकडे करून दोन्ही मुलींना दिले आणि स्वतःकाहीच खाल्ले नाही आणि ती उठून निघून गेली. जेव्हा पवित्र प्रेषित आले, तेव्हा त्यांना मी ही गोष्ट सांगितली, ते म्हणाले, जो आपल्या मुलींना चांगली वागणूक देतो, तो अनुभवेल की त्या त्याचे नरकाग्नी पासून रक्षण करतात.''[१०]

अबु शुरायाः अल खुझाई म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणाले,''हे अल्लाह मी दोन अशक्त व्यक्तिंचे रक्षण करण्यात विफल होण्यास पापकर्म मानतो, एक अनाथ आणि दुसरे स्त्रिया.''[११]

अबु हुरैरा म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणाले, ''स्त्रीयांशी कनवाळूपणे वागा, स्त्रीला बरगळीपासून निर्माण करण्यात आले आहे आणि बरगळीचा सर्वात वरील भाग हा अतिशय बाकदरा असतो. जर तुम्ही त्याला सरळ करण्याचा प्रयत्न केला, तर तो तुटेल आणि त्याला तसेच राहू दिले तर तो त्याच स्थितीत राहील. म्हणून स्त्रीला कनवाळूपणे वागवा.''[१२]

अबु हुरैरा म्हणतात, की पवित्र प्रेषित म्हणाले, ''कोणत्याही मुस्लिम पुरूषाने मुस्लिम स्त्रीचा विद्वेष करू नये. जर त्याला तिचा एक गुण नापसंत असेल, तर त्याला दिसून येईल, की तिच्यात अन्य चांगले गुण आहेत.''[१३]

अबु हुरैरा म्हणतात, की पवित्र प्रेषित म्हणाले, ''जेव्हा पती आपल्या पत्नीला जवळ बोलावतो आणि ती येत नाही आणि तो संपूर्ण रात्र तिच्यावर नाराजीच्या स्थितीत व्यतित करतो, तेव्हा त्या स्त्रीचा संपूर्ण रात्रभर ईशदूत धिक्कार करतात.''[१४]

अबु हुरैरा म्हणतात, की पवित्र प्रेषित म्हणाले, ''जर मी एखाद्या व्यक्तिला दुसऱ्या व्यक्तिसमोर दंडवत करायची पनवानगी दिली असती, तर मी पत्नीला आज्ञा केली असती, की तिने तिच्या पतीला दंडवत करावे.''[१५]

उम्मे सलमा म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणाले, ''जर एखादी स्त्री अशा परिस्थितीत की जेव्हा तिचा पती तिच्यावर प्रसन्न होता मरण पावते, तेव्हा ती सरळ स्वर्गात जाते.''[१६]

उसामा इब्ने ज़ैद म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणाले, ''मी पुरूषांसाठी स्त्री शिवाय अन्य कोणतीही कठोर परिक्षा ठेवलेली नाही.''[१७]

अबु हुरैरा म्हणतात की, पवित्र प्रेषित म्हणाले, ''जे दीनार तुम्ही अल्लाहच्या कार्यासाठी खर्च करता, त्यातील तो दीनार, जो तुम्ही गुलामाला मुक्त करण्यासाठी खर्च करता, जो दीनार तुम्ही गरीबांच्या कल्याणासाठी खर्च करता आणि जो दीनार तुम्ही आपल्या पत्नी आणि मुला-बाळांसाठी खर्च करता, त्यापैकी सर्वांत उत्तम मोबदला तुम्हाला तुम्ही आपल्या पत्नी आणि मुलां-बाळांवर खर्च केलेल्या दीनारबद्दल मिळेल.''[१८]

सआद अबी वक्कास एका प्रदिर्घ पैगंबर वचनाचा उल्लेख करताना म्हणतात की, पवित्र पैगंबर म्हणाले की, ''जे काही तुम्ही

अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी खर्च करतात, त्यात तुम्ही आपल्या पत्नीच्या तोंडात घास भरवता, त्याचाही मोबदला अल्लाह तुम्हाला देईल.''[१९]

हजरत आयशा म्हणतात की, मला पवित्र पैगंबरांच्या कोणत्याही पत्नी बद्दल इतकी ईर्षा वाटली नाही जेवढी हजरत खदीजा (पवित्र पैगंबरांची पहिली पत्नी) बद्दल वाटली, जरी मी त्यांना कधीही पाहिले नव्हते. पवित्र पैगंबर त्यांचा वारंवार उल्लेख करत, जेव्हा ते एखादी बकरी कापत, तेव्हा त्यातील मांसाचे काही टुकडे ते हजरत खदीजा यांच्या मैत्रीणीकडे पाठवत. काही वेळा मी त्यांना म्हणत असे की, तुम्ही खदीजा बद्दल असे बोलता, की जणू जगात तिच्या सारखी दुसरी स्त्री झालीच नाही आणि ते म्हणत, ''ती अशी होती, ती अशी होती आणि तिच्यापासून मला मूल झाली.'' [२०]

## संदर्भसूची


इब्ने माजाः, किताबुन्निकाह, बाब मा जा फ़ील फज़्ले निकाह, हदीस क्रमांक १८४६

[२]सहीह अल बुख़ारी,किताबुद् दआवत, बाब मा यकूलू इज़ा अता अल्लाह, हदीस क्र.६३८८

[३]सुनन इब्ने माजाः किताबुत्त तलाक, हदीस क्रमांक २०१८

[४]सुनन अल तिरमिज़ी, अबवाबुल मनाकिब, बाब फज़्ली अज़्वाजीं नबी, हदीस क्रमांक ३८९५

[५]कंज़ूल उम्माल, खंड ८ किताबुन्निकाह, हदीस क्रमांक ४५४३१

[६]सुनन अबी दाऊद, अबवाबुन् नओम, हदीस क्रमांक ५१४६

[७]सुनन अबी दाऊद, किताबुन्निकाह, हदीस क्रमांक २१४२

[८]सुनन अल तिरमिज़ी, अबवाबुर रिदा, हदीस क्रमांक ११६२

[९]सहीह अल मुस्लिम, किताबुर रिदा, हदीस क्रमांक ३६४३

[१०]सहीह अल बुख़ारी, किताबुज़्ज़कात, हदीस क्रमांक १४१८

[११]सुनन अल कुबरा लिन् निसाई, खंड ५ किताबुल ईशरतीन् निसा, हदीस क्रमांक ९१५०

[१२]सहीह अल बुख़ारी, किताबुल अहादीसुल अन्बिया हदीस क्रमांक ३३३१

[१३]सहीह अल मुस्लिम, किताबुर रिदा, हदीस क्रमांक ३६४८

[१४]सहीह अल बुख़ारी, किताबुन्निकाह, हदीस क्रमांक ५१९३

[१५]सुनन अल तिरमिज़ी, अबवाबुर रिदा, हदीस क्रमांक ११५९

[१६]सुनन अल तिरमिज़ी, अबवाबुर रिदा, ११६१

[१७]सहीह अल बुख़ारी, किताबुन्निकाह, हदीस क्रमांक ५०९६

[१८]सहीह अल मुस्लिम, किताबुज़्जकात, हदीस क्रमांक २३११

[१९]सहीह अल बुख़ारी, किताबुल ईमान, हदीस क्रमांक ५६

[२०]सहीह अल बुख़ारी, किताबुल मनाक़िबील अन्सार, हदीस क्रमांक ३८१८